# पंढरी संचार

• पंढरपूर • बुधवार, ५ फेब्रुवारी २०२५
• किंमत ₹ ४ • पाने : ८

NO PAIDNEWS NEWSPAPER

pandharisanchar.com | RNI-MAH-MAR/1499/2000 | • वर्ष २९ • अंक - २५६




ही तर वारकरी सांप्रदायाची सल (खास लेख) PII



लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळावर नियुक्त्या केव्हा? PIII

## माघी यात्रेनिमित्त प्रशासनाची तयारी सुरु

# पंढरीत भाविकांची गर्दी वाढू लागली

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** माघी यात्रेतील एकादशी सोहळा शनिवार दि. ८ फेब्रुवारी रोजी साजरा होणार आहे. माघी यात्रेनिमित्त विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी पंढरपुरात भाविकांची गर्दी वाढू लागली आहे. दर्शन रांगेत भाविकांना त्रास होऊ नये म्हणून मंदिर समिती वतीने ज्यादा चार दर्शन मंडप उभारणीचे काम सुरू करण्यात आले आहे.

पंढरपूर राज्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असल्यामुळे विठ्ठलाच्या दर्शनासाठी दररोज 50 हजाराहून अधिक भाविक येतात. यंदाचा माघी यात्रा सोहळा सुरू झाला आहे. ८ फेब्रुवारी रोजी एकादशी सोहळा साजरा होणार आहे. या दिवशी विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी पंढरीत भाविकांची गर्दी वाढू लागली आहे.



पंढरपूर : माघी यात्रेनिमित्त विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती वतीने रिद्धी सिद्धी गणपती मंदिरा जवळ दर्शना मंडप उभारणीचे काम सुरू करण्यात आले आहे.

माघी यात्रेसाठी पंढरपुरात सुमारे तीन ते चार लाख भाविक दाखल होतात. यामुळे दर्शन रांगेतील भाविकांना सुविधा मिळाव्यात म्हणून विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीने गोपाळपूर रोडवरील रिद्धी सिद्धी गणपती मंदिराजवळ कायमस्वरूपी असलेले चार व तात्पुरते आणखी चार दर्शन मंडप उभारणीचे काम सुरू करण्यात आले आहे. या ठिकाणी भाविकांना चहा, नाष्टा, भोजन आदी सुविधा देण्यात येणार आहेत.

दर्शन रांगेत घुसखोरी होऊ नये म्हणून बॅरेकेटींग करण्यात येणार असून पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. माघी यात्रेत उन्हाळा असल्यामुळे उन्हाचा त्रास भाविकांना होऊ नये म्हणून दर्शन रांगेवर छत टाकण्यात आले आहे. तसेच भाविकांना विविध ठिकाणी थंड व शुद्ध पाणी देण्याचे नियोजन मंदिर समितीच्यावतीने करण्यात आले आहे. यात्रेसाठी आलेल्या भाविकांना कोणताही त्रास होऊ नये याची दक्षता मंदिर समिती, पोलीस प्रशासन व नगरपरिषदेच्यावतीने घेतली जात आहे. ज्याठिकाणी दर्शन रांगेत भाविक उभा राहतात त्याठिकाणी प्रशासनाच्यावतीने अॅब्युलन्सचीही सोय करण्यात आली आहे.

माघी यात्रेसाठी पंढरपुरात रेल्वे, एसटी व खाजगी वाहनाने भाविक दाखल होऊ लागले आहेत. यामुळे गर्दीने रस्ते फुलून गेले आहेत. शासनाने भाविकांची निवासाची सोय भक्ती सागर 65 एकर येथे केली आहे. या ठिकाणी भाविकांना 24 तास पाणी, वीज, आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

## » At a Glance

### केळीची विक्री थेट प्रयागराज कुंभ मेळ्यात!



**करमाळा :** करमाळा तालुक्यातील केळी थेट प्रयागराज येथील कुंभमेळा येथे विक्रीसाठी पाठवण्यात आली आहे. सदर ठिकाणी प्रतिक्विंटल २१०० रुपये भाव मिळत असल्याने शेतकऱ्यांतून समाधान व्यक्त होत आहे. केळीला मागणी वाढताच दरातही तेजी आली आहे. गेल्या दोन महिन्यांत केळीचे दर गडगडले असले तरी सद्यःस्थितीत केळीला प्रति क्विंटल २००० ते २१०० रुपयांपर्यंत दर मिळत आहे.

### कोयत्याचा धाक दाखवत दरोड्याचा प्रयत्न



**करमाळा :** ४ ते ५ दरोडेखोरांनी घरात प्रवेश करत हॉलमध्ये झोपलेल्या महिलांना कोयत्याचा धाक दाखवून तिजोरीच्या चाव्यांची मागणी केली. त्यांनी चाव्या देण्यास नकार दिल्याने दरोडेखोरांनी कोयत्याने मारहाण करण्यास सुरुवात केली. या घटनेत २ महिला गंभीर जखमी झाल्या आहेत. कंदर (ता. करमाळा) येथील येथील प्रसिद्ध केळी व्यावसायिक किरण डोके यांच्या घरी हा सशस्त्र दरोडा टाकण्याचा प्रयत्न झाला आहे. या हल्ल्यात ज्योती कल्याण डोके व श्रद्धा कल्याण डोके या माय-लेकी गंभीर जखमी झाल्या. घरातील लोकांनी आरडाओरडा केल्याने शेजारील लोक जागे झाले.

### कमलाभवानी चरणी 2 लाखाचा सोन्याचा हार अर्पण

**करमाळा :** करमाळ्याचे आराध्य दैवत श्री कमलादेवी चरणी अंदाजे 2 लाख रुपये किंमतीचा सोन्याचा गजरा एका देवी भक्ताने अर्पण केला आहे. विशेष म्हणजे या भक्ताने आपले नाव कुठेही जाहीर केले जाऊ नये, अशी इच्छा ट्रस्ट कडे व्यक्त केली. त्यानंतर मंदिर ट्रस्टशी बोलून सोन्याचा गजरा कमलादेवी चरणी अर्पण केला. यावेळी श्री कमलादेवी मंदिराचे पुजारी बापू पुजारी, दादासाहेब पुजारी, तुषार सोरटे, सहदेव सोरटे, पुरोहित श्रीनिवास पुराणिक, पद्माकर सूर्यपुजारी, रोहित पुजारी, लक्ष्मण हवलदार, व्यवस्थापक अशोक गाठे आदी उपस्थित होते.

## डॉ.शितल शहा यांना सर्वोच्च साधक मानपत्र

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** गेली 40 वर्षे डॉ. शितल शहा वैद्यकीय क्षेत्रात काम करत आहेत. त्यांनी अनेक गोरगरिबांच्या मुलांना जीवदान दिले आहे. अनेकांकडून रक्कम न घेता मोफत औषधोपचार केले आहेत. यामुळे अनेक पालक त्यांना देवदूत म्हणून संबोधत आहेत. सामाजिक क्षेत्रात भरीव कामगिरी केल्याबद्दल जैन समाजातील सर्वोच्च साधक मानपत्र देऊन डॉ.शितल शहा यांचा सन्मान करण्यात आला .

आढीव येथे एक कोटी रुपये खर्च करून डॉ. शितल शहा यांनी जैन समाजाचे मंदिर बांधून दिले आहे. या मंदिरात पंचकल्याणक महोत्सव सुरू आहे. या महोत्सवासाठी अनेक जैन समाजातील अनेक संत-महंत उपस्थित आहेत. गेली 40 वर्षे डॉ. शितल शहा यांनी वैद्यकीय क्षेत्रात चांगले काम केले आहे. अनेक गरिबांच्या मुलांना मोफत उपचार देऊन त्यांना जीवदान दिले आहे. त्यांचे समाजातील चांगले कार्य लक्षात घेऊन जैन समाजातील सर्वोच्च साधक मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला . आढीव येथे होत असलेल्या कार्यक्रमात आमदार समाधान आवताडे यांच्या हस्ते डॉ. शितल शहा यांना मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आला. यावेळी आमदार अभिजीत पाटील, सहकार शिरोमणी साखर कारखान्याचे चेअरमन कल्याण काळे व जैन समाजातील अनेक नागरिक, महिला उपस्थित होत्या.





### तीन वर्षांच्या बालकाचा शेततळ्यात बुडून मृत्यू

**सांगोला :** खेळता खेळता शेततळ्यात बुडून मृत्यू झालेल्या अवघ्या तीन वर्षांच्या बालकाचा तब्बल तासांनंतर ११ एकुलत्या मुलाचा मृतदेह बाहेर काढताच माता-पित्यासह नातेवाइकांनी हंबरडा फोडला. ही दुर्दैवी घटना दुपारी एक वाजण्याच्या सुमारास चोपडी (ता. सांगोला) येथे घडली. प्रियांश अजित भोसले (वय ३) असे मृत बालकाचे नाव आहे. याबाबत ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी यांनी खबर दिली असून, पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

## टाकळी बायपास रस्त्याची दुरावस्था

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पंढरपूर तालुक्यातील टाकळी बायपास ते व्हाया कासेगाव ह्या रस्त्याचे लगत असणारी गावाअंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती ही रस्त्यांसाठी मलमपट्टी तर कामगार आणि वाहनचालकांसाठी डोकेदुखी ठरत आहे.

टाकळीबायपास ते व्हाया कासेगाव ह्या मार्गावरील एक दोन महिन्यांपूर्वी पडलेले खड्डे दुरुस्ती करून डांबरीकरण करण्यात आले होते.परत एकदा डांबरीकरण म्हणजे पडलेले खड्डे भरून घेण्याचे काम झाले आहे. परंतु अवघ्या दोन महिन्यात या रस्त्याची दुरूस्ती करावी लागत आहे. त्यावेळी करण्यात आलेल्या या कामाचा दर्जा काय असेल ? असा प्रश्न निर्माण होत आहे. अशा कामांमधून केवळ ठेकेदार पोसले जात असल्याचा नागरिकांचा आरोप आहे. गावा लगत ह्या रस्त्याजवळ खडी उघडी पडली आहे. त्यामुळे वाहन जाताना रस्त्यावरील खडी उडून दुकानाचे काचा फुटल्या आहेत. संबंधित कामावर प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे नागरिकांतून चर्चिले जात आहे. जुना पंढरपूर ते कासेगाव रस्त्याची दुरावस्था झाल्याने ग्रामस्थाना धुळीसह अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.



### थुंकल्यामुळे 69 व्यक्तींवर केली दंडात्मक कारवाई

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**सोलापूर :** मनपा आयुक्त शीतल तेली-उगले यांच्या आदेशान्वये आणि अतिरिक्त आयुक्त रवि पवार यांच्या मार्गदर्शना खाली, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांच्या नेतृत्वाखाली गुटका व मावा खाऊन सार्वजनिक भागात थुंकणारे व लघुशंका करणाऱ्या नागरिकांवर पायबंद घालणे तसेच प्लास्टिक बंदी इत्यादी मोहीम हाती घेण्यात आली आहे. या अंतर्गत मनपा अधिकाऱ्यांनी विविध पानटपरी धारकांना थुंकलेले साफ करायला लावले. तसेच विविध सार्वजनिक ठिकाणी थुंकलेल्या एकूण 69 व्यक्तींवर दंडात्मक कारवाई करून 16050/- इतकी रक्कम दंड म्हणून वसूल करण्यात आली.

## खेड भोसे ग्रामसभेत दारूबंदीचा ठराव ; महिलांतून स्वागत

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** खेडभोसे ग्रामपंचायत ने ग्रामसभा घेतली. यामध्ये गावात दारूबंदी करण्याचा ठराव करण्यात आला आहे. गावात दारूबंदी होणार असल्याने या निर्णयाचे महिला वर्गातून स्वागत होत आहे. प्रत्येक ग्रामपंचायतीने 26 जानेवारी रोजी ग्रामसभा घेणे बंधनकारक आहे. या ग्रामसभेत गावातील विविध प्रश्नावर चर्चा करून विकास कामे करण्यावर भर दिला जातो. पंढरपूर तालुक्यातील खेडभोसे ग्रामपंचायतची ग्रामसभा ३ फेब्रुवारी रोजी घेण्यात आली. या ग्रामसभेस सरपंच सुरेखा देवळे, उपसरपंच शुभांगी साळुंखे, ग्रामसेवक वैभव गायकवाड यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते. या ग्रामसभेत विविध विकास कामावर चर्चा करण्यात आली. यानंतर गावात गेल्या अनेक वर्षापासून दारू विक्री होत आहे. यामुळे तरुण पिढी व्यसनाधीन झाली आहे. दारूमुळे अनेक महिलांचे संसार उध्वस्त झाले आहेत. याची दखल घेऊन गावात दारूबंदी करण्याचा ठराव घेण्यात आला. यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

» ठराव मंजूर

ग्रामसभेस पोलीस व उत्पादन शुल्कच्या अधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे असे पत्र ग्रामपंचायतीने दिले होते. मात्र पोलीस व उत्पादन शुल्कचे अधिकारी उपस्थित राहिले नाहीत. यामुळे दारूबंदी करण्याबाबत अधिकाऱ्यांची भूमिका उदासीन असल्याचे दिसून येत आहे. गावात दारूबंदी करण्याचा ठराव करण्यात आल्यामुळे महिलातून आनंद व्यक्त होत आहे.

### 4 हजारांहून अधिक शेतकऱ्यांकडून नोंदणी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**सोलापूर :** शासनाच्या विविध कृषीसंलग्न योजनांचा लाभ पात्र शेतकऱ्यांपर्यंत जलदगतीने व अधिक प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी अॅग्रिस्टॅक योजनेअंतर्गत शेतकरी ओळख क्रमांक दिला जात आहे. शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांसाठी अॅग्रिस्टॅक ही योजना अत्यंत महत्वाची आहे. गेल्या काही दिवसांपासून सोलापूर जिल्हा प्रशासनाकडून अॅग्रिस्टॅक ही योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी विविध शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे. दक्षिण सोलापूर तहसील कार्यालयाकडून आयोजित शिबिरात 4 हजारांहून अधिक शेतकऱ्यांकडून अॅग्रिस्टॅकची नोंदणी झाली आहे.

## पाणी पुरवठा योजना गतीने पूर्ण करा – मंत्री गुलाबराव पाटील

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्यातील पाणी पुरवठा योजनेअंतर्गत सुरू असलेल्या योजनांची कामे गतीने करावीत, असे निर्देश पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले.

मंत्रालयात अहिल्यानगर पाणी पुरवठा अंतर्गत जल जीवन मिशनच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस आमदार सदानंद दाते, प्रधान सचिव संजय खंदारे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे सदस्य सचिव अभिषेक कृष्णा, अहिल्यानगरचे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, नाशिक विभागाचे मुख्य अभियंता राम लोलपोड यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.



मंत्री पाटील म्हणाले, नागरिकांना पाणी मिळविण्यासाठी सुरू असलेल्या योजना गतीने पूर्ण कराव्यात. समस्यांवर तातडीने उपाययोजना कराव्यात. पाणी पुरवठा योजनेतील कामांची तपासणी करण्यात यावी. जे ठेकेदार किंवा अधिकारी कामामध्ये विलंब करतात, त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी. पाणी पुरवठा योजना ही ग्रामीण भागांतील नागरिकांसाठी जीवनावश्यक आहे. त्यामुळे योजनेच्या अंमलबजावणीसाठी ठोस रोडमॅप तयार करणे, पाणीपुरवठ्याची गुणवत्ता आणि प्रमाण तपासणे आणि कामाच्या प्रगतीचा नियमित आढावा घेणे अत्यंत आवश्यक असल्याचे मंत्री पाटील यांनी सांगितले.

## लाडक्या बहिणींना बसणार झटका

# घरी चार चाकी वाहन आहे का? याची पाहणी होणार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** गोरगरीब महिलांना मदत करण्यासाठी शासनाने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली आहे. यासाठी नियम व अटी आहेत. मात्र अनेक महिलांनी यासाठी अर्ज दाखल करून योजनेचा लाभ घेण्यास सुरुवात केली आहे. यामुळे शासनाने ज्या महिलांच्या घरी चार चाकी वाहन आहे याची पाहणी करण्यासाठी अंगणवाडी सेविकांची नियुक्ती केली आहे. ५ फेब्रुवारी पासून अंगणवाडी सेविका लाडक्या बहिणीच्या घरी जाऊन वाहन आहे का? याची पाहणी करणार आहेत. यामुळे अनेक महिलांचे धावे दणाणले आहेत.

लोकसभा निवडणुकीत महायुती शासनाला म्हणावे तसे यश मिळाले नाही यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत यश मिळविण्यासाठी महायुती शासनाने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली. या योजनेचा लाभ गरीब सर्वसामान्य कुटुंबातील महिलांना मिळावा असा उद्देश होता. यासाठी नियम व अटी घालण्यात आल्या होत्या. महिलेचे वय 21 ते 65 दरम्यान असावे. घरात चार चाकी वाहन नसावे. उत्पन्न 2 लाख 50 हजार पेक्षा कमी असावे, घरात शासकीय नोकरी करणारा नसावा असे नियम होते. मात्र अनेक महिलांनी यासाठी अर्ज दाखल केले. निवडणुकीची रणधुमाळी असल्यामुळे सर्व अर्जाची छाननी करणे शासनाला शक्य झाले नाही. यामुळे दाखल झालेल्या सर्व लाडक्या बहिणींना योजनेचा लाभ देण्यात आला. यामुळे महिला वर्गातून समाधान व्यक्त करण्यात आले. पुन्हा राज्यात महायुतीची सत्ता आली. मात्र आता शासनाने अर्जाची छाननी करण्यास सुरुवात केली असून ज्या महिलांच्या घरात चार चाकी वाहन आहे व उत्पन्न अडीच लाखाच्यावर आहे. घरात शासकीय नोकरी करणारा व्यक्ती असेल अशा महिलांना या योजनेतून वगळण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. नुकतीच महिला व बालकल्याण समितीचे सचिव अनुपकुमार यादव यांनी बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी अंगणवाडी सेविका यांना महिलांच्या घरोघरी जाऊन घरात चार चाकी वाहन आहे का? व इतर माहिती घेण्यास सूचना केली आहे. यामुळे ५ फेब्रुवारी पासून अंगणवाडी सेविका लाडक्या बहिणींच्या घरी जाऊन पाहणी करणार आहेत. ज्या महिला नियम व अटीमध्ये बसत नाहीत त्यांचे नाव योजनेतून रद्द करण्यात येणार आहे. महिला व बालकल्याण विभागाने परिवहन अधिकारी आरटीओ यांच्याकडून चार चाकी वाहनाची यादी घेतली आहे. ही यादी जिल्हाधिकारी यांना सादर करण्यात येणार असून ज्या महिलांच्या घरी वाहन आहे त्यांची नावे योजनेतून रद्द करण्यात येणार आहे. यामुळे अनेक महिलांनी याचा धसका घेतला आहे.

पंढरी संचार

### येडशी-लातूर महामार्गावर अपघात 2 फोटोग्राफरचा मृत्यू

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क




**बार्शी :** बार्शी तालुक्यातील चिंचोलीजवळ सोमवारी रात्रीच्या सुमारास दुचाकी घसरून दोन फोटोग्राफरचा दुर्दैवी मृत्यू झाला. या अपघातात सुरज पांडुरंग माळी (रा. पांगरी, ता. बार्शी) आणि रवीकिरण रविंद्र शिंदे (रा. चिंचोली, ता. बार्शी) या दोघांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला. सोमवारी रात्री ००:१५ वाजण्याच्या सुमारास सुयश सुहास शिंदे (वय २६, रा. चिंचोली) हे आपल्या बहिणीसह मोटारसायकलवरून घरी जात असताना, मौजे चिंचोली येथील नाना चौधरी यांच्या शेताजवळ त्यांना रस्त्याच्या कडेला एक व्यक्ती गंभीर जखमी अवस्थेत पडलेला दिसला.

## शासकीय बलोरो गाडी व एसटीचा अपघात

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पंढरपूर तहसील कार्यालयातील शासकीय बेलेरो गाडी व एसटी या दोन वाहनांचा शेगाव दुमाला परिसरात अपघात झाला. या अपघातात कोणीही जखमी झाले नाही. मात्र तहसीलदारांच्या गाडीचे नुकसान झाले.

मंगळवारी पहाटे तहसील कार्यालयाची बेलेरो कार शेगाव दुमाला येथून पंढरपूर कडे येत होती. तेव्हा याच रस्त्याने एसटी गाडी येत होती. एसटीने बेलेरो गाडीला पाठीमागून धडक दिली. या बेलेरो गाडीमध्ये तीन तलाठी व चालक होते. मात्र कोणीही जखमी झाले नाही. या अपघातात तहसीलच्या गाडीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. याबाबत तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.



**सोलापूर :** वीज बील, जागेचे भाडे, सौंदर्य प्रसादने यासह विविध साहित्याच्या दरांमध्ये वाढ झाली आहे. या कारणास्तव ही दरवाढ करण्यात आली आहे. सोलापूर शहरातील सर्व नाभिक दुकानदारांनी दाढी - कटिंगच्या दरात 20 टक्के दरवाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार कटिंगसाठी आता 120 रुपये तर दाढीसाठी 60 रुपये द्यावे लागतील, अशी माहिती नाभिक दुकानदार बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष प्रभाकर भालेकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. नाभिक दुकानदारांनी फेब्रुवारी 2023 मध्ये दरवाढ केली होती. दोन वर्षांनतर पुन्हा दरवाढीचा निर्णय घ्यावा लागला.

### दामाजी सह.साखर कारखान्यावर

# स्व. रतनचंद शहा यांचे १०५ व्या जयंतीनिमीत्त अभिवादन

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क



**मंगळवेढा :** श्री संत दामाजी सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक व्हाईस चेअरमन स्व. रतनचंद शहा शेठजी यांच्या १०५ व्या जयंतीच्या निमीत्ताने दामाजी कारखाना कार्यस्थळावरील पूर्णाकृती पुतळ्यास रतनचंद शहा बँकेचे चेअरमन श्री राहूल शहा यांचे हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी बँकेचे संचालक किसन गवळी, चंद्रशेखर कौंडूभैरी, मुझफ्फर काझी, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष प्रथमेश पाटील, सागर गुरव, राहूल चौगुले उपस्थित होते. याप्रसंगी अभिवादन करताना श्री राहूल शहा म्हणाले, अडचणींना तोंड देत संत दामाजी साखर कारखान्याची उभारणी संस्थापक चेअरमन स्व.किसनलाल मर्दा वकील आणि संस्थापक व्हाईस चेअरमन स्व.रतनचंद शहा शेठजी यांनी केली. सदर कारखाना उभारणीपूर्वी तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना इतर कारखान्यांनवा ऊस गळीतासाठी पाठवताना मानसिक त्रास होवुन अडचणी होत होत्या.

तालुक्याला साखर कारखान्याची गरज असलेचे ओळखून सभासद-शेतक-यांची आर्थिक प्रगती व्हावी या उद्देशाने स्व. मर्दासाहेब व स्व.शहा साहेब यांनी हा कारखाना उभा केला. तालुक्याच्या विकासासाठी त्यांचे योगदान मोठे आहे. विद्यमान चेअरमन श्री शिवानंद पाटील, व्हाईस चेअरमन श्री तानाजीभाऊ खरात व संचालक मंडळ यांनी या कारखान्याचे कामकाज आदर्शवत ठेवले आहे. या संचालक मंडळाने सभासद-शेतकरी, तोडणी वाहतुक ठेकेदार यांची बिले वेळेवर दिल्याने तालुक्यातील शेतकरी समाधानी दिसत आहेत. तसेच कर्मचारी वर्गाच्या पगारी व असणारी देणी वेळेवर दिलेली आहेत.

सर्व घटकांच्या अडचणी सोडवुन कारखान्याची प्रगती होताना दिसत असलेचे शहा यांनी सांगीतले.

याप्रसंगी कारखान्याचे प्र. कार्यकारी संचालक श्री रमेश जायभाय, चिफ इंजिनिअर सचिन गुंड, शेती अधिकारी कृष्णात ठवरे, चिफ अकौंटंट रमेश गणेशकर, कार्यालयीन अधिक्षक दगडू फटे, लेबर ऑफिसर आप्पासो शिनगारे, स्टोअरकिपर उत्तम भूसे, ईडीपी मॅनेजर मनोज चेळेकर, पर्चेस ऑफिसर संदिप इंगोले, केनयार्ड सुपरवायझर प्रकाश पाटील, सुरक्षा अधिकारी लक्ष्मण बेदरे तसेच विभागप्रमुख, कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कारखान्यात अधिकारी, कर्मचारी व सभासदांनी परिश्रम घेतले.

## महिलांनी सामाजिक जबाबदारी स्वीकारली पाहिजे - पाळेकर



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मोहोळ :** महिलांनी सामाजिक जबाबदारी स्वीकारली पाहिजे. घर व सामजिक जवाबदारी यांची सांगड घालून समजासाठी काम करा.येथील इनरव्हील क्लबच्या महिलांचे कार्य हे अत्यंत योग्य पणे चालू आहे. असे प्रतिपादन शोभना पाळेकर यांनी हॅपी प्रोजेक्ट स्कूल अंतर्गत उपक्रमात केले.

या उपक्रमा अंतर्गत क्लब ने दत्तक घेलेल्या अण्णाभाऊ साठे या शाळेचे रंग काम करून देण्यात आले.यावेळी शाळेस १० बेंच हि देण्यात आले .या कामाचे उद्घाटन जिल्हा चेअरमन शोभना पाळेकर यांनी केले.पाळेकर यांनी यावेळी इनरव्हील च्या कामाची पहाणी केली.भविष्यात जेष्ठ नागरिक,बाळंत महिला यांच्या साठी उपक्रम राबवण्या बाबत त्यांनी मार्गदर्शन केले.यावेळी अध्यक्ष नागश्री दोशी,भाग्यश्री पाटील, संस्थापक अध्यक्ष वैशाली शहा, निकिता चव्हाण,मेघा शहा,निर्मला भांबुरे, ज्योती भांबुरे,दिपाली ढवळसकर, वर्षा गाडवे, सविता घोळवे, लता चव्हाण, निकिता चव्हाण या उपस्थित होत्या.

## सन्मान...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**अकलूज :** भारतीय संघातील खो-खो वर्ल्डकप विजेता वेळापूर गावचा सुपुत्र रामजी कश्यप यांचा खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी सत्कार केला. रामजी कश्यप यांनी आपल्या मेहनतीने आणि खो खो खेळातील कौशल्याने संपूर्ण देशाचे नाव उज्वल केले आहे. त्याच्या उज्वल वाटचालीसाठी खासदार मोहिते पाटील यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

» Selected

## खंडणी मागितल्या प्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल




**सोलापूर :** गाडीचे हप्ते न भरल्याने कर्जदाराच्या मुलाचे अपहरण करून दहा हजारांची खंडणी मागितल्या प्रकरणी तिघांना अटक करण्यात आली आहे. हा प्रकार एक फेब्रुवारी रोजी दुपारी साडेतीन ते सायंकाळी सहा वाजण्याच्या दरम्यान घडला. यामध्ये सुरेखा धीरज रंगदाळ( वय 47 राहणार गीता नगर ) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शकील नजीर अहमद बोडे ( वय 29 राहणार 70 फूट रोड, सोलापूर) इम्रान नसीम शेख ( वय 35 राहणार शास्त्रीनगर, सोलापूर) देवा जाधव ( वय 34 राहणार सोलापूर ) अशी अटक करण्यात आलेल्या तिघांची नावे आहेत.

## समस्यांना वाचा फोडण्यासाठी संपर्क अभियान राबवणार



**सोलापूर :** मी सोलापूर माझे सोलापूर परिवर्तन विकास समितीच्या माध्यमातून सोलापूरकरांच्या विविध समस्यांना वाचा फोडण्यासाठी लोकशाही मार्गाने 5 ते 20 फेब्रुवारी पर्यंत सोलापुरातील विविध समस्यांचे सर्व विभागाच्या शासकीय अधिकाऱ्यांना निवेदन देण्यासाठी पंधरवाडा अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच 21 फेब्रुवारी ते 20 मार्च पर्यंत सोलापूर शहरातील 177 झोपडपट्ट्यांमधील समस्या आणि समस्यांना वाचा फोडण्यासाठी आणि न्याय देण्यासाठी एक संपर्क अभियान राबविण्याचा निर्धार केल्याची माहिती विष्णू कारमपुरी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

## शिवजन्मोत्सव महामंडळाचे मनपा आयुक्तांना निवेदन



**सोलापूर :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळ सोलापूरच्या वतीने श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य दिव्य पुतळ्याची प्रतिष्ठापना डाळिंबी आणि मैदान येथे करण्यात येते. त्या निमित्ताने या ठिकाणी मनपाकडून सालाबादप्रमाणे मैदानाची साफसफाई करणे, मंडप टाकणे, रोलिंग करणे, रंगरंगोटी करणे, लाइटिंग करणे, कुस्तीचा आखाडा तयार करणे, प्रेक्षकांसाठी बसण्यासाठी गॅलरी तयार करणे यासह विविध मागण्यांचे निवेदन मनपा आयुक्त शितल तेली उगले यांना देण्यात आले. यावेळी नाना काळे आदी उपस्थित होते.

# ही तर वारकरी सांप्रदायाची सल



वै.ह.भ.प.भगवानबाबा

जीवनाची व्यथा, जीवनाची कथा बनू शकते. जीवनाचे निर्मळ स्थान गंगा, गोदेचा प्रवाह ठरु शकतो. हिमाच्छादीत बर्फाची उंची वैभवाची साथ करते. तशी अंतःकरणाची शुद्धी विचाराची, भावनेची उंची अंतःकरणाला श्रद्धेचा महासागर बनते. याच कल्पनेतून १२ व्या शतकात संत ज्ञानेश्वर महाराजांचा सारखा ईश्वराची दैवी प्रतीकृती असलेल्या १३ वर्षाच्या बालकांनी या विश्वाला भूरळ टाकणारा १८ अध्यायाचे विश्लेषण करणारा ज्ञानेश्वरी सारखा परमपवित्र आणि श्रद्धेनी ओथंबलेला ग्रंथ लिहिला. पुढे ३०० वर्षांनी देहूतल्या भंडारा भामचंद्र गडावरती उपासी-तापासी पोटी गळ्यात विणा, हातात चिपळ्या घेऊन त्या विठुरायाचे नामस्मरण करत करत जी सगळ्या विश्वाला भुरळ टाकली त्या जगद्गुरु संत तुकाराम महाराजांनी अक्षशः श्रद्धेचा महापुर चांद्यापासून-बांद्यापर्यंत आणि श्रीलंकेपासून अमेरिका, बलुचिस्तानपर्यंत इतकेच नव्हे तर जर्मनीतसुद्धा आपल्या विचारांनी अध्यात्मिक भुरळ टाकली. ज्यांच्या कुटुंबियांनी पांडुरंगाच्या चरणाजवळ ११ लोकांनी समाध्या घेतल्या त्या संत शिरोमणी नामदेवरायांनी पंढरपूरपासून घुमानपर्यंत (पंजाब) श्रद्धेची, भावनेची आणि वारकरी सांप्रदायाच्या विचाराची पायवाट रुंद करुन टाकली. हे आमच्या वारकरी सांप्रदायाच्या संतांच्या विचाराची अनुभूती आहे. संपूर्ण विश्वात जात, पात, धर्म, लहान, मोठा, गरीब, श्रीमंत याचा विचार न करता गळ्यात तुळशीची माळ घालणारा प्रत्येक वारकरी जीवनाची कृतार्थता सिद्ध करु शकतो. हे पंढरी, आळंदी, देहूतल्या कोट्यावधी भाविकांच्या श्रद्धेतून निर्माण झालेली भावनेची गंगा भक्तांच्या स्नानाला जी सिद्ध झाली तीच या संतांच्या विचाराची अनुभूती मानावी लागेल. शांतीब्रह्म एकनाथ महाराज, अरणचे सावता माळी, मंगळवेढ्याचे दामाजी, सासवडचे सोपानकाका यांच्यापासून चालत आलेली ही भावनेची, श्रद्धेची आणि अंतःकरणातून निर्माण झालेल्या विश्वासाची वारकरी सांप्रदायाची भगवी पताका आजही सर्वसामान्य माणसाच्या जीवनाला श्रद्धेतून, भावनेतून आधार देते हे वास्तव नाकारता येणार नाही.

या संतांच्या विचारांनी अलिकडे वारकरी सांप्रदायात लहानश्या स्वरुपात परिवर्तनाची चाहूल निर्माण होताना दिसते. याला कारण आहे स्वार्थी, भोंदु, आपमतलबी आणि स्वतःला संत म्हणवून घेण्याची यत्कचिंतही शक्यता नसता श्रद्धेचा बाजार करुन पोटाची खळगी भरणाऱ्या संतांची वृद्धी होताना दिसते. हे वास्तवही आपण नाकारु शकत नाही.

गेल्या आठ ते दहा दिवसापासून मराठवाड्यातील अत्यंत पवित्र स्थान असलेल्या भगवान गडावरच्या मठाधिपती असलेल्या ह.भ.प. वेदतज्ञ, वक्तृत्वाची अविस्मरणीच देणगी लाभलेले, स्वार्थांधाचे बाळकडू प्यायलेले, सत्याला असत्याची झालर लावणारे आणि ज्यांनी पूज्य भगवान बाबांना सेवा करत करत ज्यांनी आपले आयुष्य घालविले त्या कै. गोपीनाथ मुंडे यांच्या कुटुंबातल्या प्रामाणिक राजकारणाच्या आधारावर जीवन जगत जगत स्वतःची वेगळी प्रतिमा निर्माण करणाऱ्या विद्यमान मंत्री सौ.पंकजा मुंडे यांच्यावर व्देषारोप करुन त्यांना भगवान गडाच्या श्रद्धेपासून बाजूला करणारे नामदेव शास्त्री या संत महात्म्यांनी केलेल्या एका वक्तव्याची संपूर्ण महाराष्ट्रभर आज चर्चा चालू आहे. या विषयावर प्रकाश टाकण्याचे एकमेव कारण म्हणजे भगवान गडाचे पूज्य मठाधिपती वै. ह.भ.प. पूज्य भगवानबाबा आणि आळंदी येथील वारकरी शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष, ख्यातनाम प्राचार्य आणि अखेरचा श्वास असेपर्यंत आळंदी ते पंढरपूर पायी यात्रा करुन संत ज्ञानेश्वर महाराज, जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या विचाराची उधळण करणारे शं. वा. दांडेकर उर्फ मामासाहेब दांडेकर या दोघांचे अत्यंतिक सख्य होते. या दोघांमधील होणाऱ्या अध्यात्मिक चर्चा ऐकण्याचे भाग्य अस्मादिकांना लाभले. अशा महान विभुती असलेल्या भगवान गडावरील विद्यमान मठाधिपती नामदेव शास्त्रींनी एखाद्या आरोपीची पाठराखण करावी हे वारकरी सांप्रदायाच्या दृष्टीने अत्यंत दुर्दैव असे उदाहरण मानावे लागेल. याच भारताच्या भूमीवर रामायणाचा इतिहास घडलाय. येणाऱ्या- जाणाऱ्या वाटसरुंची लुट करणारा वाल्या पूज्य नारदजींच्या मार्गदर्शनाने वाल्मिकी झाला. तो हा महाराष्ट्र आहे. भगवान गडावरच्या या वाल्मीकीने वाऱ्याची पाठराखण करावी. ही आमची संत परंपरा आहे? एखाद्या साधुपुरुषांनी आपल्या आधीच्या गादीवर असलेल्या महान विभुतींनी अध्यात्मिक पराक्रम करुन प्रचंड व्यसनमुक्ती केली. हिंसा करणारी वृत्ती समवून टाकली, मद्यपींना गळ्यात तुळशीची माळ घालून सन्मार्गाला लावले, आचार-विचाराचे आदान प्रदान केले. आणि अख्खा बीड जिल्हा नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राच्या सर्व भागात ज्या पूज्य भगवान बाबांनी अध्यात्मिक विचाराची उधळण केली. ते पूज्य भगवान बाबा आणि त्याचे पवित्र कार्य ह.भ.प. नामदेवशास्त्री असून सुद्धा विसरु शकले ? पूज्य भगवान बाबांनी पंढरपूरच्या ज्ञानेश्वर मंडपाला लागून असलेल्या गडकर मठाची भव्य दिव्य वास्तु उभारण्याची कल्पना सुद्धा कधी मनात आणली नाही. प्रवेशव्दाराच्या जवळ असलेल्या एका जुन्या चार खणी इमारतीत बाबा वास्तव्याला असायचे. बंडोपंत नावाचे एक शिष्य मठाची देखभाल करत होते.



प्रासंगिक
बाळासाहेब बडवे
(भागवताचार्य)
मो.नं.7028543453

रोज भगवानबाबांच्या प्रतिमेला १०१ तुळशी वाहिल्याशिवाय बंडोपंतांनी पाण्याचा थेंब कधी मुखात घेतला नाही. कारण पुज्य भगवानबाबांनी शिष्याच्या रुपाने त्यांना जो मार्ग दाखविला तो ही सत्प्रवृतीच वाटाड्या होता.

अशा सत्प्रवृत संताच्या विचाराची उधळण करणाऱ्या संतांची परंपरा आपण खंडीत करतोय असा विचार नामदेव शास्त्रींच्या मनात का आला नाही? पंढरपूरातल्या वारकरी सांप्रदायाची महती चंद्र-सूर्य असेतोपर्यंत कायम राहणार आहे. या प्रत्येक वारकऱ्यांनी आपली जीवन माऊली विठ्ठल आणि तुकोबाराय यांना अर्पण केलेले आहे. अशा कोट्यावधी जीवनांचा आधार असलेल्या भगवान बाबांच्या गादीवर बसलेल्या नामदेव महाराजांना ही बुद्धी सुचली कशी? हा संशोधनाचा विषय आहे. अनेकांनी नामदेव शास्त्रींनी पाठराखण केलेल्यावर विविध आरोप केले. त्या प्रत्येक आरोपाचे फोटोशेसन झाले. कागदपत्रं पुढं आली. कोर्टाचा एखादा निवाडा पुढे आला. तरीही हा माणूस अपराधी नाही हे सांगण्याचे धाडस एखादा संत महात्मा करु शकतो ही वारकरी सांप्रदायाच्या दृष्टीने एक लाजीरवाणी गोष्ट आहे. आपण कुणाला पाठीशी घालतो, कोणत्या माणसाची पाठराखण करतो, कुणाला सोड्यात स्वच्छ धुवून बाहेर काढतो याची जाणीव शास्त्री म्हणून नामाधिन पावलेल्या संताला रुचलेच कसे हा महत्वाचा प्रश्न आहे.

वै. ह.भ.प. धुंडा महाराज देगलूरकर, वै.ह.भ.प. अंमळनेरकर महाराज, वै. राशनकर महाराज, वै. गंगुकाका महाराज, वै. चातुर्मासी महाराज, वै. बाबा महाराज सातारकर, आणि अनेक मठाधिपती ज्यांनी ही संत विचाराची परंपरा या क्षणापर्यंत तेवत ठेवली आणि त्याचा तेजस्वी प्रकाश टिकविण्याचे काम आजही ह.भ.प. चैतन्य महाराज देगलूरकर, ह.भ.प. जयवंत महाराज बोधले, ह.भ.प. कबीर महाराज, ह.भ.प. चंद्रशेखर देगलूरकर महाराज, ह.भ.प. राऊत महाराज, ह.भ.प. शंकर महाराज बडवे, अशा शेकडो तरुण शक्तींनी या ज्योतीला अधिक दैदीप्यमान करण्याची भूमिका घेताना दिसतात. अशा तरुण संतापैकी एकानीही लांडीलबाडी करणारांची, चोरांची, अश्लिलवर्तन करणारांची पाठराखण कधी केली नाही. चंद्रभागेच्या वाळवंटात असंख्य तंबू ठोकून जाती-पातीचा विचार पायदळी तुडवून रात्रं दिवस पांडुरंगाच्या नामस्मरणाचा धावा करतात ते पवित्र विचाराचे वारकरी भक्त कुणीकडे आणि भगवाड गडासारख्या एका दैदिप्यमान आदर्श संस्थानचे अधिपती कुणीकडे याचा विचार वारकरी सामाजात झाल्याशिवाय राहणार नाही.

पूज्य भगवानबाबांनी आपल्या महंत पदावर बसवण्यासाठी जो विचार केला. अनेक संतांशी चर्चा केली त्या महंत वै. ह.भ.प भिमसिंग बाबा यांच्या विरोधात कुणी पाय उचलले ही अशोभनीय कृती करण्याच्या पाठीमागे याचा विचार कधी केलाय का? संत ज्ञानेश्वर महाराज, जगद्गुरु तुकाराम महाराज यांची संतत्व प्रधान वृत्ती आता विश्वव्यापी बनलेली आहे. संत जगद्गुरु तुकाराम महाराजांचा



वै.ह.भ.प. प्रा. शं.वा. उर्फ मामासाहेब दांडेकर

एक अभंग आहे-

**पंढरीचे भूत मोठे ।**
**आल्या गेल्या झडपी वाटे।।**
**बहु खेचरीचे रान ।**
**जाता वेडे होय मन ।।**

हा तुकोबारायांचा रुपकात्मक अभंग आहे. पण या अभंगातले भूत मोठेपणाचे, स्वार्थीपणाचे, अहंगंडतेचे, भगवान गडावर पोहोचले नाही ना ? याची शंका आल्याशिवाय राहात नाही. आजही भगवानबाबांच्या पायाने जे मृत्रिकाकण कपाळा लावताना हजारो भक्त दिसतात. या भक्तांना खऱ्या अर्थाने विटेवरच्या भूतांनी भक्तीनी, शक्तींनी पांघरुन घातलेले असते. आणि याच भूतांनी पूज्य भगवानबाबांचा भगवाडगड हा पावित्र्याचा हिमालय बनवलाय. अशा ठिकाणाहून कुणाची पाठराखण आपण करावी याचा विचार आपण कुणाची गादी चालवतो यांनी करणे जरुरीचे नाही का? वारकरी सांप्रदाय भक्तीचा, श्रद्धेचा भुकेला आहे. त्यांनी अहंकार तुडवायला सांगितलाय. स्वार्थ नेस्तनाबूत करायला सांगितलाय. ऐश्वर्याची भावना कुस्करुन टाकायला सांगितलीय. आणि हेच भगवान गडाचे दैदिप्यमान ठिकाण आहे. आपण कुणाची पाठराखण करतो त्याची किंमत मोजावी लागणार आहे. थोडे दिवस थांबा, वाट पहा आणि समाजाच्या प्रति, वारकरी पंथाच्या प्रति संवेदना प्रकट करा आणि जीवन कृतार्थ करा हीच अपेक्षा ! बालब्रह्मचारी प्रखर वेदांती वै. ह.भ.प. बाबुराव महाराज वाघ हे भगवान गडाच्या पायथ्याशी असलेल्या नगर जिल्ह्यातील राणेगांव ता. शेवगाव येथील रहिवाशी. ते आज असले असते तर त्यांनी शास्त्री महाराजांची कथा जरुर सांगितली असती. पण दुर्दैव आहे.



